महाराष्ट्र पोलीस
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/२८/२०२२ दि. ११/०३/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रातील ठाणेनगर वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. १४/०४/२०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३१ व्या जयंती निमित्त कोर्टनाका व ठाणे रेल्वे स्टेशन पश्चिम येथे वंदन कार्यक्रम होणार असुन कोर्टनाका ते ठाणे रेल्वे स्टेशन मार्गावर मिरवणुका निघणार असून त्याकरीता मोठया प्रमाणात अनुयायी उपस्थित राहणार आहेत. कोर्टनाका ते ठाणे रेल्वे स्टेशन मार्गावर मिरवणुकांमुळे गर्दी होणार आहे. सदर ठिकाणची वाहतुक सुरळीत व सुरक्षीत रहावी, वाहतुकीची कोंडी होवु नये, या करीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद** – १) जीपीओ कडुन कोर्ट नाका, जांभळी नाका, अे वन फर्निचरकडे जाणा–या व टॉवर नाका शिवाजी पथ मुस चौक स्टेशन रोड कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना जीपीओ चौक येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने जी.पी.ओ येथुन डावीकडे वळण घेवून सेंट्रल मैदान रोडने ठाणे कारागृह मार्गे क्रिक नाका येथुन दादोजी कोंडदेव स्टेडीयम, अे वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – २) कळवा, क्रिक नाका कडुन उर्जिता हॉटेल मार्गे कोर्टनाकाकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना क्रिक नाका येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने क्रिक नाका कडून दादोजी कोंडदेव स्टेडीयम मार्गे अे–वन फर्निचर येथून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – ३) रेल्वे स्टेशन कडून मुस चौक शिवाजी पथ, टेंभीनाका, सिव्हील हॉस्पिटल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना आलोक हॉटेल येथे "प्रवेश बंद" करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदरची वाहने ठाणे रेल्वे स्टेशन येथुन गोखले रोडने सरळ जावून टेलिफोन नाका येथून उजवीकडे वळण घेवुन हरिनिवास सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. १४/०४/२०२२ रोजी सायंकाळी १९:०० वा. ते रात्रौ २४:०० वा. पर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग,ठाणे शहर

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

Scanned with CamScanner

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग ठाणे.

Scanned with CamScanner